# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दूरध्वनी क्रमांक : ०२२ ६६४०५०६६ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


==========================================================================

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ १८७२ दि. ०९/१२/२०२०

<u>प्रसिद्धी पत्रक</u>

# म्हाडाच्या पुणे मंडळातर्फे ५६४७ सदनिकांच्या सोडतीसाठी अर्ज नोंदणीला उद्यापासून प्रारंभ

मुंबई दि. ०९ डिसेंबर, २०२० : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा विभागीय घटक) पुणे, सोलापूर, कोल्हापूर व सांगली येथील विविध गृहनिर्माण योजनेतील ५ हजार ६४७ सदनिका व कोल्हापूर येथील ६८ भूखंडांच्या विक्रीसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी, अर्ज करणे या प्रक्रियेचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या हस्ते मंत्रालयातील समिती कक्षामध्ये गुरुवार, दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी दुपारी २.३० वाजता करण्यात येणार आहे.

राज्याचे गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली व गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. सतेज पाटील, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवासन, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. नितीन माने-पाटील यांनी दिली.

या सोडतीत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधलेल्या पुणे जिल्ह्यातील म्हाळुंगे येथे ५१४ सदनिका, तळेगाव दाभाडे (ता. मावळ) येथे २९६ सदनिका, सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे ७७ सदनिका, सांगली येथे ७४ सदनिकांचा समावेश आहे. तसेच म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत उभारलेल्या मोरवाडी पिंपरी (पुणे) येथील ८७ सदनिका, पिंपरी वाघिरे (पुणे) येथील ९९२ सदनिका तर सांगली येथील १२९ सदनिकांचा देखील या सोडतीत समावेश आहे. या सोडतीत अत्यल्प , अल्प , मध्यम आणि उच्च उत्पन्न गटांसाठी सदनिका उपलब्ध आहेत. तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी येथील ६८ भूखंड देखील या सोडतीत विक्रीसाठी उपलब्ध करवून देण्यात आले आहेत.

दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी दुपारी ३ वाजेपासून ऑनलाइन अर्ज नोंदणीला सुरुवात होणार असून नोंदणीकृत अर्जदार सायंकाळी ६ वाजेपासून ऑनलाईन अर्ज भरू शकतील. तसेच ऑनलाईन अर्ज नोंदणी दिनांक ११ जानेवारी, २०२१ पर्यंत सायंकाळी ५ वाजेपर्यंत करता येणार आहे. दिनांक १२ जानेवारी, २०२१ रात्री ११.०० वाजेपर्यंत अर्जदारांना ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहेत. दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी रात्री ११.०० पर्यंत ऑनलाइन अनामत रक्कमेची स्वीकृती केली जाणार आहे. तसेच दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी संबंधित बँकांच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS / NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल.

https://lottery.mhada.gov.in या संकेतस्थळावर सदनिका सोडतीबाबत माहिती पुस्तिका व अर्जाचा नमुना उपलब्ध राहील. दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी प्राप्त अर्जाची सोडत कार्यक्रम पुणे मंडळाच्या कार्यालयात सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात येणार आहे

सदनिकांच्या वितरणासाठी म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तीशी परस्पर व्यवहार करू नये तसे केल्यास पुणे मंडळ कोणत्याही व्यवहारास / फसवणूकीस जबाबदार राहणार नाही, असे आवाहन म्हाडातर्फे करण्यात येत आहे.

**(वैशाली गडपाले)**
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

========